



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २१६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.१८ मार्च २०२५


## नागपुरात औरंगजेबाच्या कबरीचा वाद पेटला, दोन गटात तणाव, दगडफेक आणि जाळपोळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, नागपूर :** औरंगजेबाच्या कबरीभोवती सुरू असलेल्या वादावरून मंगळवारी संध्याकाळी नागपूरच्या महाल परिसरात दोन गटांमध्ये संघर्ष झाल्याने तणाव वाढला आहे. औरंगजेबाची कबर हटवण्यासाठी काही संघटनांनी केलेल्या आंदोलनादरम्यान मुस्लिम समुदायाचा पवित्र ग्रंथ जाळल्याच्या अफवांमुळे पोलिसांवर दगडफेक करण्यात आली, ज्यामध्ये दोन जण जखमी झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**मख्यमंत्र्यांकडून शांततेचे आवाहन...**

मुख्यमंत्री कार्यालयानुसार, नागपूरच्या महाल भागात दगडफ ेक आणि तणावपूर्ण परिस्थितीनंतर पोलीस प्रशासन परिस्थिती हाताळत आहे. या परिस्थितीत नागरिकांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. आम्ही सतत पोलिस प्रशासनाच्या संपर्कात आहोत आणि नागरिकांनी त्यांना सहकार्य करावे. नागपूर हे शांतताप्रिय आणि सहकार्यशील शहर आहे. हीच नागपूरची परंपरा आहे. अशा परिस्थितीत, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका आणि प्रशासनाला पूर्ण सहकार्य करा.

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर नागपूरचे खासदार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही नागपूरकरांना शांततेचे आणि पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. चिटणीस पार्क आणि महाल भागात जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. दुपारी उशिरा कोतवाली आणि गणेशपेठ येथेही हिंसाचार पसरल्याची माहिती मिळाली असल्याचे, अधिकाऱ्यांनी सांगितले.



**वाहनांच्या काचा फोडल्या**

काही समाजकंटकांनी पोलिसांविरुद्ध निदर्शने करीत रस्त्यावरी वाहनांची तोडफोड केली. ई रिक्षा आणि ऑटो रस्त्यावर उलटवून रस्ता बंद करण्याचा प्रयत्न केला. रस्त्यावर उभ्या दुचाकींचीसुद्धा तोडफोड केली. यामध्ये सर्वाधिक नुकसान ई रिक्षाचे झाले आहे. पोलिसांचा मोठा ताफा तैनात करण्यात आला असून, पोलीस आयुक्त,सहआयुक्तांसह सर्वच अधिकारी महालमध्ये दाखल होऊन परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**नेमकं काय आहे प्रकरण?**

आज सायंकाळी सात ते साडेसातच्या दरम्यान शिवाजी चौकाजवळ एका गटाने घोषणाबाजी सुरू केली. यामध्ये त्यांचा दुपारी विश्व हिंदू परिषदेच्या आंदोलनासंदर्भात त्यांचा रोष होता, घोषणाबाजी सुरू होताच परिसरातील दुसऱ्या गटानेही घोषणाबाजीला सुरुवात केल्याने वाद वाढला. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घोषणाबाजी करणाऱ्या दोन्ही गटांना पांगवले. मात्र, पुढे चिटणीस पार्कच्याकडील भालदारपुरा दिशेने पोलिसांवर दगडफ ेक सुरु झाली. त्यानंतर पोलिसांनी बळाचा वापर करत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी अश्रु धुराच्या नळकांड्या फोडल्या.

## अहिल्यानगरमध्ये वाळू तस्करांविरुद्ध मोहीम; २८ जणांना अटक

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जिल्ह्यातील वाळू तस्करांविरुद्ध विशेष मोहिम राबवली. गेल्या दोन दिवसात एकुण ११ ठिकाणी छापे टाकून २८ जणांविरुद्ध अकरा गुन्हे दाखल करत सुमारे १ कोटी २८ लाख रुपये किंमतीचे वाळू साठे व वाहने जप्त केली. जिल्ह्याच्या उत्तर भागातील विशेषतः गोदावरी नदीपात्रात ही मोहीम राबवली गेली.

जिल्ह्यातील श्रीरामपूर, शेवगाव, नेवासा, कोपरगाव, राहता व पारनेर या तालुक्यांमध्ये पोलिसांनी ही मोहीम राबवली. त्यासाठी पोलिसांची विविध पथके तयार करण्यात आली होती. जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्या सूचनेनुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या



नेतृत्वाखाली पोलिस अंमलदार अतुल लोटके, गणेश लोंढे, संदीप दरंदले, बीरप्पा करमल, सोमनाथ झांबरे, रोहित येमूल, भाऊसाहेब कांबळे, अमोल कोतकर, विशाल तनपुरे, रमीजराजा आत्तार, अशोक लीपाणे, उमाकांत गावडे यांच्या पथकाने श्रीरामपूर, राहता, कोपरगाव, मिरजगाव, पारनेर, नेवासा येथे सात ठिकाणी छापे टाकून १३ आरोपींविरुद्ध ७ गुन्हे दाखल केले. त्यांच्याकडून वाळू साठे व वाहने असा ८८ लाख ५३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याशिवाय श्रीरामपूर व शेवगाव तालुक्यातील वाळू तस्करांवर कारवाई करत १५ आरोपींविरुद्ध ४ गुन्हे दाखल केले.

त्यामध्ये ४० लाख २० हजार रुपये किंमतीचे वाळू साठे व वाहने जप्त केली. या कारवाईमध्ये पोलिस अंमलदार गणेश लोंढे, गणेश भिंगारदे, किशोर शिरसाट, बाळासाहेब खेडकर यांनी सहभाग घेतला. या मोहिमेत आणि नदीपात्रात अनेक ठिकाणी बेकायदेशीर वाळू उपसा करतानाच तस्करांना पकडण्यात आले. एकट्या श्रीरामपूर तालुक्यातच ४० लाखाचे वाळू साठे व वाहने जप्त करण्यात आली.

## दुर्दैवी घराचा भाग कोसळला, ढिगाऱ्याखाली दबून बापलेकाचा मृत्यू



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, बुलडाणा :** चिखली तालुक्याची आजची सकाळ खळबळजनक आणि तितकीच गंभीर बातमी घेऊन आली! यामुळे भीषण दुर्दैवी घटनेचे साक्षीदार ठरलेले शेलोडी हे गाव सुन्न झाले असून संपूर्ण चिखली तालुका हादरला आहे. घटनेची माहिती वाऱ्याच्या वेगाने पसरताच बुलढाणा जिल्ह्यातही हळहळ व्यक्त होत आहे.

चिखली तालुक्यातील शेलोडी येथे ही भीषण घटनाक्रम घडला आहे. जुनाट घराचा धाबा (छत) कोसळून त्या ढिगाऱ्याखाली दबून बापलेकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. आज सोमवारी, १७ मार्च रोजी सकाळी ही खळबळजनक घटना घडली. या घटनेचा विस्तृत तपशील येथे अजून प्राप्त झाला नाही. मात्र प्राप्त प्राथमिक माहितीनुसार शेलोडी येथील दामोदर घाडगे यांनी जुने माळदाचे (धाब्याचे) घर पाडून नवे घर बांधायचे ठरविले .जुन्या काळात सागवान ची मोठ्या आकाराची लाकडे आणि पांढरी माती (वा चुनखडी?) वापरून या घराचे छत (धाबा) तयार करण्यात येत असत. हे जुने घर पाडून नवीन घर बांधवयाचे असल्याने दामोदर घाडगे यांनी माळूद पाडण्याचे काम गावातीलच शालिग्राम वाळूस्कर यांना ठोक पद्धतीने दिले होते. दरम्यान कडक उन्हामुळे आज सोमवारी ,१७ मार्चच्या सकाळीच शालिग्राम वाळूस्कर त्यांचा मुलगा योगेश, राम घाडगे, सुनील नेमाने यांनी माळूद पाडण्याचे काम सुरु केले होते.. मात्र दुर्दैवाने जीर्ण झालेले माळूद (छत) जुन्या लाकडांसह मजुरांच्या अंगावर कोसळले. यात शालिग्राम वाळूस्कर (६५) आणि त्याचा मुलगा योगेश वाळूस्कर(३२) यांचा मलब्याखाली दबून भीषण मृत्यू झाला. तसेच मजूर राम घाडगे आणि सुनील नेमाने हे दोघे गंभीर जखमी झाले. काहीतरी कोसळल्याचा जोरदार आवाज झाल्याने गावकऱ्यांनी घाडगे यांच्या घराच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी चौघाना ढिगाऱ्या खालून कसेबसे बाहेर काढले. दोघां जखमीना चिखली येथील एका खाजगी दवाखान्यात उपचार साठी भरती करण्यात आले आहे . त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. दोघांच्या दुर्दैवी मृत्यूने शेलोडी गावात शोक कळा पसरली असून चिखली तालुक्यात खळबळ उडाली आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये पुन्हा महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा

### आ.रोहित पवारांच्या हस्ते स्पर्धेच्या मैदानाचे कर्जतमध्ये मातीपूजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, कर्जत (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या वतीने कर्जत येथे २६ ते ३० मार्च दरम्यान महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अहिल्यानगर येथे महाराष्ट्र कुस्तीगीर संघाने काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित केली होती. आता कुस्तीगीर परिषदेने पुन्हा कर्जतमध्ये स्पर्धा आयोजित केली आहे. यानिमित्ताने राज्यातील नाम ांकित पहेलवानांचा शड्डू पुन्हा एकदा घुमणार आहे. आमदार रोहित पवार आणि कुस्तीगीर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते कर्जतमधील दादा पाटील महाविद्यालयाशेजारील मैदानावर या स्पर्धेच्या मैदानाचे मातीपूजन करण्यात आले.



या कुस्ती अधिवेशनाची जोरदार तयारी सध्या सुरू असून, आमदार पवार मित्र परिवार व अहिल्यानगर जिल्हा तालीम संघाने कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र केसरीच्या इतिहासात अभूतपूर्व असा हा कुस्ती महोत्सव ठरावा, यासाठी राजकारण विसरून सर्वजण सहयोग देत आहेत. राज्यभरातील सुमारे ९०० हून अधिक मल्ल या स्पर्धेत सहभागी होणार असून, कोणत्याही मल्लावर अन्याय होणार नाही, याची काळजी घेऊ, असे आमदार पवार यांनी सांगितले. या कुस्ती महोत्सवादरम्यान जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराजांच्या पादुका सिद्धटेक तीर्थक्षेत्री आणल्या जाणार आहेत. ह्यामहाराष्ट्र केसरीचे सर्व विजेतेही या स्पर्धे ला हजेरी लावणार आहेत. तसेच महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार स्पर्धेच्या समारोपाला उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय सुविधा, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पंचांची नियुक्ती केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. निकालाची गुणवत्ता अचूक ठरावी यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

## छत्रपतींचे कार्य डोळ्यासमोर ठेवा : हर्षवर्धन पाटील

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, इंदापूर :** छत्रपती शिवरायांचे, छत्रपती संभाजी राजांचे ध्येय व कार्य डोळ्यासमोर ठेवा. कार्यकर्त्यांनो नाउमेद होऊ नका. छत्रपती शिवरायांनी मुठभर मावळे एकत्र करून महाराष्ट्रामध्ये हिंदवी स्वराज्य स्थापन केले.

हा इतिहास व आदर्श डोळ्यासमोर ठेवा .आणि कामाला लागा. असे आवाहन करीत 'जय शिवराय ' हि आपली स्लोगन राहिल ,अशी शिवगर्जना राज्याचे माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते हर्षवर्धन पाटील यांनी सांगली येथे नुकत्याच राष्ट्रवादीच्या मेळाव्यात कार्यकर्त्यांसमोर केली. विधानसभा निवडणुका पार पाडल्यानंतर पश्चिम महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा प्रथमच सांगली येथे मेळावा आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. दरम्यान हर्षवर्धन पाटील नवा उत्साह घेऊन नव्या दमाने पक्ष संघटनेच्या कामाला पुन्हा लागल्याने इंदापूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांना उभारी आल्याचे चित्र दिसत आहे.

लोकसभा निवडणुकी मधील राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस व मित्र पक्षाच्या आघाडीची परिस्थिती विधानसभा निवडणुकीमध्ये का राहिली नाही .याची कारणे मिमांसा झाली पाहिजे .कार्यकर्त्यांनी आपल्या कामांमध्ये झालेल्या चुका दुरुस्त केल्या पाहिजेत. नवा विचार घेऊन आता आपल्याला पुढे जाण्याची गरज आहे .आपल्याकडे आता सत्ता नसल्यामुळे आपण जरी कोणाला काही देऊ शकलो नाही.

तरी सुद्धा लोकांच्या न्याय हक्कासाठी वेळप्रसंगी आता मोर्चे, आंदोलने काढून रस्त्यावर यावे लागेल. याची तयारी कार्यकर्त्यांनी ठेवली पाहिजे. असे स्पष्ट करून ते म्हणाले ,पक्षाने आपल्याला काय दिले .हा प्रश्न विचारण्यापेक्षा आपण पक्षासाठी काय केले .हा मुद्दा आज घडीला महत्त्वाचा असून कार्यकर्त्यांनी प्रत्येक बुथवर आत्मपरीक्षण व अभ्यास केला पाहिजे.

## थोडक्यात

### मुंबईकरांना झळा...

### कोरड्या वातावरणाचा अंदाज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** मागील आठवड्यात मुंबईकरांना मिळालेल्या किंचितशा तापमान दिलाशाला पूर्णविराम मिळाला असून मुंबईकरांना सोमवारी संपूर्ण दिवस उष्ण झळांचा सामना करावा लागला. कोरड्या वाऱ्यांमुळे दुपारी प्रवास करणाऱ्या मुंबईकरांना अक्षरशः भाजून निघाल्याची जाणीव होत होती.

मुंबईमध्ये सोमवारी मागील काही दिवसांच्या तुलनेत तापमानात किंचित वाढ झाली . हवामान विभागच्या कुलाबा केंद्रात सोमवारी ३२.५ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ केंद्रात ३४.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. रविवारच्या तुलनेत सोमवारी काही अंशानी तापमानात वाढ झाली. तापमान कमी नोंदले गेले असले तरी, कोरड्या, उष्ण वाऱ्यांनी ही जाणीव अधिक त्रासदायक झाली. आर्द्रतेमुळे येणारा घाम परवडला, पण कोरड्या हवेमध्ये भाजून निघाल्याची जाणीव असह्य असल्याची भावना मुबंईकरांनी व्यक्त केली. दरम्यान, प्रादेशिक हवाम ान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईत पुढील काही दिवस कोरड्या वातावरणाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या कालावधीत किमान तापमानाचा पारा २४ ते २६ अंशापर्यंत जाऊ शकतो. त्यामुळे सकाळच्या वेळीही अस्वस्थता जाणवू शकते. तर, कमाल तापमानाचा पारा ३४ ते ३६ अंशापर्यंत असेल. या कालावधीत आकाश निरभ्र असू शकेल. त्यामुळे कोरडे वारे आणि उन्हाच्या झळा यांचा ताप होऊ शकेल.

दरम्यान, मागील आठवड्यात मुंबईतील तापमानात सलग चार ते पाच दिवस घट झाली होती. यामुळे मुंबईकरांना तापमान दिलासा मिळाला होता. मात्र, उकाड्यापासून मुंबईकरांची सुटका झालेली नाही. त्यामुळे पुढचे आणखी काही दिवस मुंबईकरांना हा उकाडा सहन करावा लागणार आहे.

### हॉटेल व्यावसायिकांकडून घरगुती गॅसचा वापर

**दि.१७, पिंपरी :** 'चिखलीत भरलेल्या सिलिंडरमधून रिकाम्या सिलेंडरम ध्ये गॅस भरून चढ्या दराने विक्री करण्याचा प्रकार तीनवेळा घडला आहे. काही हॉटेल व्यावसायिकांकडून अनधिकृतपणे घरगुती गॅसचा वापर केला जात आहे. शासनाकडून तपासणी पथक नेमून अशा ठिकाणांवर वेळोवेळी छापे टाकून गुन्हे दाखल करण्यात येत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

पिंपरी-चिंचवड शहरातील गॅसच्या काळ्या बाजाराबाबत चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत तारांकित प्रश्न विचारला. चिखलीत गॅसचा काळा बाजार झाला आहे का, अवैधरित्या गॅस भरल्याने नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होत असून, त्यावर काय कारवाई केली जात आहे, अशी विचारणा केली. उपमुख्यमंत्री पवार यांनी लेखी उत्तर दिले आहे. 'चिखलीत गॅसचा काळाबाजार करण्याच्या तीन घटना घडल्या आहेत. याप्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# संपादकीय



## गोरगरिबांचे जीव कवडीमोल

मागील आठवड्यात मुंबईतील नागपाडा येथे मोठी दुर्घटना घडली. पाण्याची टाकी साफ करण्यासाठी आत उतरलेल्या पाच मजुरांचा गुदमरून मृत्यू झाला. एका बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत ही धक्कादायक दुर्घटना घडली. या दुर्घटनेत पाच मजुरांचा मृत्यू झाला तरीही त्याची दखल माध्यमांनी घेतली नाही. नाही म्हणायला प्रिंट मीडिया म्हणजे वर्तमान पत्रात या दुर्घटनेची बातमी छापून आली पण इलेक्ट्रॉनिक मीडिया म्हणजे न्युज चॅनलने या बातमीची दखलच घेतली नाही. एरव्ही कोणत्याही अदखलपात्र बातम्या ब्रेकिंग न्युज म्हणून दाखवणाऱ्या न्युज चॅनल वाल्यांना या बातमीची दखलही घेऊशी वाटली नाही हे विशेष. अर्थात पाण्याच्या टाकीत पडून गोरगरीब मजुरांचा मृत्यू झाल्याची ही पहिली दुर्घटना नाही या आधी अशा अनेक घटना घडल्या मात्र त्याची दखल घ्यावी असे कोणाला वाटले नाही. दोन वर्षापूर्वी पुणे जिल्ह्यातील कदमवाक वस्ती ग्रामपंचायतीच्या हद्दीत लोणी स्टेशन येथे एका इमारतीच्या शौचालयाची टाकी साफ करताना चार मजुरांचा गुदमरून मृत्यू झाला होता. अर्थात या दोन घटना वर्तमानपत्रात छापून आल्यामुळे त्या लोकांना समजल्या अशा अनेक घटना नेहमी घडत असतात. अनेकदा शौचालय साफ करताना, मोठमोठे सांडपाणी वाहक बंदिस्त नाले साफ करण्याकरिता उतरलेले सफाई कामगार आतील विषारी वायूच्या संपर्कात येऊन मरण पावल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. दुर्दैवाने यात अनेकांचा बळीही गेला आहे. नवी मुंबईत अशीच एक दुर्दैवी घटना घडली होती नवी मुंबईतील एरोली येथील शिवशंकर प्लाझा या इमारती बाहेर लेनस्कर्ट या चष्म्याच्या दुकानाबाहेर लावण्यात आलेला जाहिरातीचा फलक बदलण्यासाठी लावण्यात आलेली २५ फूट उंचीची चाकवाली शिडी सरकून वरच्या उच्च दाबाच्या वाहिनीला लागल्याने तिच्यात विद्युतप्रवाह उतरला या शिडीला एका ११ वर्षाच्या गरीब मुलाचा स्पर्श झाला त्यात त्या मुलाचे जळून निधन झाले. आताची नागपाडा येथील दुर्घटना तर त्याहून मोठी आहे त्यात पाच मजुरांचा जीव गेला तरीही त्याची दखल ना माध्यमांनी घेतली ना राजकीय नेत्यांनी ना समाजाने.

आपल्या देशात गोरगरीब मजुरांचा जीव कवडीमोल आहे. हे गोरगरीब जगले काय नी मेले काय याचे कोणालाही काहीही सोयरसुतक नाही. अशा दुर्दैवी घटनेत अनेक मजुरांनी आपला जीव गमवला आहे. अनेक मजूर योग्य त्या सुरक्षेअभावी उंच बांधकामावरून पडून जीवाला मुकतात किंवा कायमचे अपंग होतात. काही मजूर पाण्याच्या, शौचालयाच्या टाकीत पडून मरतात. काही मजूर नाले सफाई करताना श्वास गुदमरून मरतात तर काही मजूर विजेच्या खांबावर चढून विजेचे काम करताना शॉक लागून मरतात. अशा प्रकारे अनैसर्गिक मृत्यू पावणाऱ्यांची संख्या शेकडोंच्या घरात असते पण त्याची दखल शासन, माध्यमे, समाज, पोलीस न्यायालय कोणीच घेत नाही कारण ते गरीब आहेत. सर्वसामान्य नागरिक आहेत तेच जर सुशांतसिंग राजपूत, पूजा चव्हाण यांच्यासारखे सेलिब्रिटी असते तर सर्व यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या असत्या. माध्यमांनी २४ तास ब्रेकिंग न्युज चालवून टाहो फोडला असता. विरोधी पक्ष किंवा राजकीय नेतेमंडळींनी निदर्शने रास्ता रोको , धरणे आंदोलने केली असती.

पण सर्व सामान्य गोरगरिबांच्या मृत्यूचे येथे कोणालाच काही देणेघेणे नाही, गरीबच होता त्याच्या मृत्यूची दखल घ्यायला तो काय सेलिब्रिटी होता का ? असाच विचार येथील यंत्रणा करत असतील म्हणूनच गोरगरिबांच्या निधनानंतर त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कोणी पुढे येत नाही. गरीब म्हणून जन्माला येणे हा या देशात शाप आहे. सेलिब्रिटींना न्याय मिळवून देण्यासाठी येथील यंत्रणा जितक्या जागृत असतात तितक्याच त्या गोरगरिबांना न्याय मिळवून देताना उदासीन असतात. गोरगरिबांच्या जीवाला येथे मोल नाही. कवडीमोल असलेले जगले काय नी मेले काय कोणालाच काही फरक पडत नाही हेच वास्तव आहे.

माणूस सामान्य असो गरीब असो की श्रीमंत असो प्रत्येकाचा जीव महत्वाचा असतो तथापि दुर्दैवी घटनांमध्ये गरिबांचे जीव हे बेदखल केले जातात, ही संतापाची बाब आहे. कोणत्याही निधनाच्या घटनेकडे सरकार बरोबरच समाजातील प्रत्येक घटकाने संवेदनशीलपणे पाहण्याची गरज आहे. आज बदलत्या समाज व्यवस्थेमध्ये संवेदनशीलता हरवत चालली आहे हे देखील सत्य आहे. समाजाने अधिक संवेदनशील राहिले पाहिजे.

# बंधने फक्त महिलांवरच का ?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे.

आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषेवरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात. आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे घालतात, जीन्स पॅन्ट टी शर्ट घालतात त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो. महिलांना ट्रोल करण्यात समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात.



महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे ? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन महिलांना टार्गेट करत असतात वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात.

बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. महिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का? महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे.

स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते. जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घालतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## पोलीसांनी बुलेटच्या ३५ सायलेन्सरवर फिरविला रोड रोलर...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, शिरूर :** रस्त्यावरुन बुलेट चालवत सायलेन्सरचा मोठा आवाज व फटाके फोडणारे किंवा कर्कश आवाज करणारे बुलेट चे सायलेन्सर पोलीसांनी कारवाई करत जप्त केले होते. अश्या ३५ सायलेन्सरची रोड रोलर च्या मदतीने विल्हेवाट लावण्यात आली असून यापुढे ही अशी कारवाई सुरुच राहणार असल्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी सांगितले. केंजळे म्हणाले पोलीस स्टेशनचा वाहतूक शाखा मार्फत शिरूर शहरातील बुलेट मोटर सायकल वर वेळोवेळी कारवाई करून फटाके फोडणारे किंवा कर्कश आवाज करणारे बुलेट चे सायलेन्सर जमा करण्यात आले होते. या सायलेन्सरची रोड रोलर च्या मदतीने नवीन पोलीस स्टेशनचा इमारती समोर या सायलेन्सर वर रोड रोलर फिरवून विल्हेवाट लावण्यात आली.

## ससे होलपट..

लाडकी झाली सुखी
पैसे जमवले झटपट
सारेकाही सोईस्कर
अधिक नसे खटपट

डोळेझाक करे असे
सगळे नियम न् अट
असे कसे म्हणायचे
दिसलीनाही ती फट

प्रत्येकांनी आपापले
काठोकाठ भरलेघट
पुढचेपुढे पाहून घेऊ
नियमांना मारले कट

रे गैर फायदे लुटणारे
असतात दांडगट धट
चांगल्या योजने मध्ये
शोधून काढतात फट

गैर व्यवहार करणारे
पायात नसते लटपट
सुटून जाण्या करता
आधीच करी खटपट

सच्चेलाभार्थी वंचित
सत्य असते हे विकट
नाठाळ अप्पल पोटी
रस्ता करतात बिकट

निकष तपासूनि पहा
कारवाई हो पटापट
ख-या लाभार्थी मात्र
ना होई ससे होलपट

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# गावाकडील पार्टीच्या आठवणी...!

**पार्टीला फक्त निमित्त हवं! मनासारखं झालं म्हणा की, काही विशेष दिवस म्हणा जसा की, वाढदिवस असो अथवा एखादा परीक्षेचा निकाल. आजकाल मित्रमंडळी लगेच पार्टीचं म्हणतात. तसंच आम्ही गावाकडील मित्रमंडळी अधून मधून पार्ट्या करायचो.त्यामध्ये विशेषत: मिरचीची भाजी हा आमचा मुख्य मेनू...!**

साधारण दहावी-बारावीत असताना,या पार्टीचे नियोजन करायला लागलो. कारण तेव्हा थोडं थोडं भाज्या कश्या बनवायच्या हे कळायला लागलं.आमच्या पार्टीतील मिरचीच्या भाजी बनवण्यासाठी आवश्यक साहित्य म्हणजे,जाड-बारीक हिरव्या मिरच्या, तूरडाळ,आंबड चुक्याची भाजी, कांदा, कोथंबीर, शेंगदाणे, खोबरं, टमाटे, लाल मिरची पावडर, हळद वगैरे व इतर मसाल्याचे पदार्थ. हे सर्व मिळून छान मिरचीची भाजी बनवून आम्ही मित्र गावाकडच्या पार्टीचा आनंद घ्यायचो. तेही अगदी बजेटमध्ये, अहो! म्हणजे एकदम कमी खर्चात प्रत्येकी पाच ते दहा रुपये जमा करायचो.हे ऐकूण कदाचित नवल वाटेल पण, हे तेवढेच खरं आहे कारण, गाव ते गाव अन अशीच गावाकडील पार्टी .....!

आम्हा मित्रांचा मिरचीच्या भाजीचा बेत ठरला की, प्रथम आईला सांगायचो, आई, आज आमच्या मित्रा- मित्रांची मिरचीच्या भाजीची पार्टी आहे मग आई पालवात नाहीतर वृत्तपत्रामध्ये पोळ्या बांधून द्यायची. इकडे आम्ही भाजीची तयारी करायचो.जवळपास सर्व मित्रांकडे शेत-जमिनी असल्यामुळे भाजीसाठी लागणारा हिरवा भाजीपाला शेतातूनच मिळायचा.सायकलवर टांग मारली की,मित्रमंडळी पैकी ज्याच्या शेतात भाजीपाला असेल त्याच्या शेतात जाऊन भाजीपाला आणायचो. मित्रमंडळी पैकी सुखदेव,किरण, विजू, गजू, हरि, संदीप,प्रवीण, उमेश, समाधान, इकबाल, सुभाष,रवी आम्ही सर्व जण ज्याच्या त्याच्या पद्धतीने नियोजनानुसार वस्तूची जुळवाजूळव करून करायचो. कुणाच्या शेतातून हिरव्या मिरच्या, आंबड-चुका,कुणाच्या शेतातून ताजे-ताजे टमाटे, तर कुणी हिरवीगार छान गावरान कोथिंबीर सोबत काकड्या,मुळे,लिंबू गाजर असा हा पौष्टिक (सलाद) कोशिंबीर घेऊन यायचे. पार्टीचं ठिकाण म्हणजे आम्हां मित्रापैकी ज्याचं शेत गावाजवळ असेल ते, म्हणजे किरण किंवा सुखदेव...! साधारण या ठिकाणी पार्टी करायला सोपं जायचं कारण, तेथे पुरेसं पाणी, विजेची व्यवस्था व इतर साहित्य जमवायलाही सोपं जायचं.त्यांनतर चवदार भाजीवर यथेच्छ ताव मारल्यानंतर घरी यायलाही सोपं जायचं. कधी-कधी ठिकाणं बदलायचे तसं त्या-त्या परिस्थितीनुसार अवलंबून असायचं.

भाजीसाठी लागणारा हिरवा भाजीपाला ज्याच्या शेतामध्ये उपलब्ध असेल तसा जो तो आणायचा. अगदी निशुल्क...!स्वतः च्या शेतात उपलब्ध नसल्यास शेजारच्या शेतातूनही घेतले तर



बिनधास्त भेटायचे. हेच खरं एकमेव वैशिष्ट्य खेड्यातील जीवनाचं अन शेतकऱ्यांचं. शेतकऱ्याचा दिल लय मोठा...! शेतकरी लय दिलदार अन मोठ्या मनाचा..! खायच्या वस्तूला कधीच नाही म्हणत नाही.अशा प्रकारे सर्व हिरवा भाजीपाला जमा केला की, तूरडाळ,खोबरं,शेंगदाने,तेल मसाल्याची पुडी, मीठ,मिरकुट,जिरं वगैरे किराणा दुकानातून घ्यायचो त्यासाठी, आम्ही सात-आठ जण मिळून पाच ते दहा रुपये जमा करून साधारण पन्नास ते साठ रुपयांमध्ये या सर्व वस्तू यायच्या, त्यातील तुरदाळ, शेंगदाणे हे सुद्धा आम्ही घरूनच बांधून आणायचो, कारण त्याही शेतातीलच असायच्या. अशा सर्व वस्तू एकत्रित जमा करून एका पिशवीत भरून,मोठं पातेलं चमचा, हिरवा भाजीपाला कापायला विळा,एक- दोन पराती आणि त्याच बरोबर ज्याचा एक ग्लास व एक जेवायला ताट, असं सर्व साहित्य घेऊन साधारण सायंकाळी दिवे लग्नाच्या वेळेस आम्ही पार्टीच्या ठिकाणी निघायचो.पोहोचल्यावर सर्वजण कामाला लागायचे. कुणी दगड मांडून चूल मांडायचे, कुणी चूल पेटवायला काड्या जमा करायचे, तर कुणी भाजीबनवण्यासाठी आणलेलं मोठं भगून (पातेलं) काळं होऊ नये म्हणून त्याला काळी माती लावायचे. नाहीतर घरून आयांचं बोलणं ऐकावे लागायचं. कोणी हौदाजवळ विहिरीतील पाण्याचा पंप लावून टोपल्यात आणि हंड्यात शुद्ध पाणी भरून ठेवायचे. ताजा हिरवा बाजीबाला धुवून घ्यायचे. ज्याच्या त्याच्या कौशल्यानुसार व आवडीनुसार लसूण सोलणे, खोबरे,टमाटे, भाजी कापणे असं काम करायचे.कारण पार्टी म्हणजे कुण्या एकट्याची नाहीतर ती सर्व मिळून असायची.म्हणून सर्वजण मदत करायचे. सर्व हिरवा भाजीपाला कापून पूर्वतयारी होईपर्यंत एका पातेल्यात तूरडाळ,खोबऱ्याचे तुकडे, टमाटे, शेंगदाणे, आंबड चुका हे शिजवायला टाकायचे.त्यातील डाळ झाली म्हणजे सर्व मिश्रण एका पातेल्यात काढून ठेवायचो.

भाजी बनवण्याची तयारी झाल्यावर आता फक्त फोडणी मारायची वेळे. हे मात्र एकाच व्यक्तीने करायचे,कारण मसाले, मिरची पावडर, किंवा मीठ कमी-जास्त झालं तर समजा भाजीचा पूर्ण बट्ट्याबोळ झालाच म्हणून समजा. भाजीला फोडणी मारायला स्पेशालिस्ट म्हणून सुगदेव...! सर्व साहित्य चुलीजवळ ठेवल्यावर चुलीवर पातेलं ठेवून, पातेल्यात तेल, कढीपत्ता, जिरं-मोहरी, कांदा, लसूण पेस्ट व एका प्लेटमध्ये बनवून ठेवलेली मसाल्याची योग्य मात्रा हे सर्व मस्तपैकी मसाल्याचा सुगंध अन ठसका येईपर्यंत त्याला पातेल्यात हलवून घ्यायचे. पूर्ण मसाला तेलात झाला व सर्वत्र मसाल्याचा वास यायला लागला कि,पातेल्यात बाजूला शिजवून ठेवलेलं व रवीने घुसळून ठेवलेलं डाळ, आंबड-चुका, टमाटे, खोबरे, शेंगदाण्याचे मिश्रण तापलेल्या तेलातील मसाल्यात टाकायचो. सर्रर्रकन असा आवाज यायचा. मित्रांच्या संख्येनुसार पाणी ओतून, त्यात मीठ आणि चिरलेली कोथिंबीर टाकली कि,एकदम झणझणीत, मसालेदार, चवदार मिरचीची भाजी तयार व्हायची.

आमच्या पार्टीतील मिरचीची भाजी तयार झाली की,झोपडीसमोर मोकळ्या जागेत गोलाकार बसून जेवायला बसायचो. खाली पोतड्यापासून बनवलेल्या पट्टीवर गोलाकार मित्रांमध्ये आतील भागात सर्व जणांच्या पालवात गुंडाळून आणलेल्या पोळ्या,भाजीचं पातेलं,लिंबू,काकडी, मुळा, कांदा, हिरवी ताजी मेथी भाजी असा सर्व (सलाद)कोशिंबीर सोबत तोंडी लावायला ठेवायचो. मोठ्या परातीमध्ये ताटाला वडगण लावून दोन-दोन पोळ्या चुरल्या की त्यावर मस्त तर्रीची भाजी फिरवली की,सर्वजण मस्त मिरचीच्या भाजीवर ताव मारायचे. भाजी थोडीफार तिखट असायचीच कारण,त्यात हिरव्या मिरच्या बरोबर लाल मिरची पावडर व मसालाही असायचा. जेवताना कधी डोळ्यातून अश्रू, तोंडातून तिखटामुळे श...श.. आहा! आहा! अहा...! असा आवाज यायचा तर कानातून धूपट निघायचे...!

अशीही आमची खेड्यातील मिरचीची भाजीची पार्टी! सदैव आठवणीत राहणारी. माझ्या गावात याभाजीला मिरचीची भाजी म्हणतात, तर खानदेशात दाल-गंडोरी म्हणतात. साहित्य व बनवण्याची पद्धत जवळपास सारखीच, मात्र वेगवेगळ्या ठिकाणी नावे वेगवेगळे असतीलही कदाचित....!

सध्या नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने वर्गमित्र व मित्रमंडळी शहराच्या ठिकाणी स्थायिक झालेत.कुणी सैन्यात भरती आहे. तर काहींचा व्यवसाय आहे,कुणी कंपनीत कार्यरत आहे मात्र सर्वांच्या आठवणीतील झनझणित,चवदार मिरचीची भाजी अन तोच सुगंध मात्र कायम स्मरणात आहे. आमच्या मित्रांची व्हाट्सअप ग्रुप वर चर्चा चालू असतांना कितीतरी आठवणींना उजाळा मिळतो. कधी खळखळून हसतो तर कधी हसता हसता डोळ्यांच्या कडा कधी ओलावतात हे कळतही नाही. मघाशी सांगितल्याप्रमाणे अगदी कमी खर्चातील आमच्या गावाकडील मिरचीची भाजी बघितली नं....!किती प्रेम आणि जिव्हाळ्यांना ओतप्रोत भरलेली...! यातून साधी-भोळी,प्रेमानं, मायेनं भरलेल्या खेड्यातील जीवनशैलीचे दर्शन घडते. त्याचबरोबर वर्गमित्रांच्या आठवणी जगण्याला बळ देणाऱ्या, निखळ, शुद्ध नि स्वार्थी प्रेमाने भरलेल्या असतात. तुमच्या सर्व आठवणीतील बालमित्रांना व माझ्या गावाकडील सर्व सवंगड्यांना समर्पित...!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांची जयंती उत्साहात साजरी

**अक्षराज : शरद भगत**

**दि.१७, फलटण :** श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांचे जन्मसथळ असलेल्या फलटण तालुक्यातील मुरुम येथे ३३२वी जयंती उत्साहात साजरी झाली. जन्मस्थळा पासून संपुर्ण मुरुम गावात पालखीची मिरवणुक काढण्यात आली. या नंतर कार्यक्रमाच्या सभेच्या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

जन्मस्थळ असलेल्या मुरुम गावाला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळावा या साठी स्थानिक नागरिकांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या कडे मागणी केली.

जन्मस्थळाची जागा अवघी २ गुंठे असल्याने या ठिकाणी कार्यक्रम करण्यास जागेची अडचण भासत असून शासनाकडे शेती वर्गातून जागा मिळावी अशी मागणी देखिल ग्रामस्थांनी मंत्र्यांकडे केली आहे. जयकुमार गोरे म्हणाले की, मी या जन्मस्थळाला ब दर्जा देऊन शासकीय निधीतून मोठे जन्मस्थळ बांधून पर्यटन स्थळ बनवू. असे आवाहन मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. या कार्यक्रमासाठी फलटण तालुक्याचे माजी आमदार तथा विधान परिषदेचे माजी सदस्य रुपणवर आण्णा, फलटणचे विद्यमान आमदार सचिन पाटील, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, लक्ष्मण हाके, आमदार उत्तमराव जानकर, विधान परिषदेचे अध्यक्ष राम शिंदे, ज्ञानेश्वर कौले, गोविंद देवकाते आदी मान्यवर उपस्थित होते.

## रब्बी पिकांना अवकाळी पावसाची धास्ती
## यंत्राच्या साह्याने गहू सोंगणी जोमात...

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.१७, अहिल्यानगर :** जिल्ह्यात मागिल चार पाच दिवसांपासून ढगाळ वातावरण निमाण होत आहे. त्यामुळे अवकाळी पावसाची शक्यता असल्याने शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झाला आहे. अनेकांनी पक्ष झालेला गहू, ज्वारी, हरबरा काढण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील बागायती भागात असलेला संगमनेर, राहुरी, कोपरगाव, शीगोंदा,पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर परिसरात गहू काढणी यंत्राच्या साह्याने जोमात सुरू झाली आहे. गहू काढणीच्या कामास मजूर मिळत नसल्याने हार्वे स्टरच्या मदतीने गहू काढणीच्या कामांना वेग आला आहे. ग्रामीण भागामध्ये गहू काढणी मशीन आल्यामुळे प्रत्येक शेतकरी हार्वेस्टिंग मशिनच्या साह्याने गहू काढत आहे. सरासरी एक एकर गहू काढणीसाठी ३००० ते ६००० हजार रुपये प्रमाणे पैसे घेतले जातात, अर्ध्या पाऊण तासामध्ये गहू काढून होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कष्ट व वेळ वाचत आहे. दररोज अवकाळी पावसाचे वातावरणात होत असलेला बदल पहाता या भितीने शेतकऱ्यांनी नुकसान टाळण्यासाठी काढणीला आलेल्या गहू काढणीची कामे सुरू केली आहे. हाता - तोंडाशी आलेली पिके मळणी करून धान्याची रास घरात आणण्यासाठी शेतकरी धडपडत आहेत. गहू काढणीची पूर्वीची पद्धत आता कालबाह्य झाली आहे. आधुनिक हार्वेस्टिंग मशिनच्या मदतीने कमी वेळात गहू काढणी होत असल्याने शेतकरी त्यास पसंती देत आहेत.

## विसपुते महाविद्यालयात टाकाऊ पासून टिकाऊ स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**



**दि.१७, पनवेल :** माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षणाचे महत्व शालेय स्तरावरील तसेच महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी पनवेल महानगर पालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक १६ मार्च रोजी डी.डी. विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालयात टाकाऊ पासून टिकाऊ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समजावे यासाठी उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार शाळा व महाविद्यालयांमध्ये शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषा, चर्चासत्र, विविध खेळांचे आयोजन करण्यात येत आहेत. माझी वसुंधरा अभियानातील आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या महत्वाच्या घटकांनूसार डी.डी. विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालयात टाकाऊ पासून टिकाऊ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विद्यार्थिनींनी घरातील टाकाऊ पदार्थापासून पासून सुंदर अशा टिकाऊ व शोभेच्या वस्तू तयार केल्या होत्या.

या कार्यक्रमास आदर्श शैक्षणिक समुहाचे अध्यक्ष धनराज विसपुते, महापालिकेच्या आरोग्य विभागाचे प्रमुख अनिल कोकरे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे उपस्थित होत्या. यावेळी उत्तम वस्तू तयार केलेल्या विद्यार्थिनींना प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

## महसूल आयुक्तालय नांदेड येथेच स्थापन करा...

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१७, हदगाव (नांदेड) :** गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या महसूल आयुक्तालयाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावून आयुक्तालय नांदेड येथेच स्थापन करावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कार्यकारणी सदस्य सुनील हरिहरराव सोनुले यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पाठवलेल्या निवेदनात सोनुले यांनी म्हटले आहे की, नांदेड जिल्हा हा मराठवाड्यात सर्वाधिक १६ तालुके असलेला जिल्हा असून जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १०,५२८ चौ.किमी आहे. नांदेड येथे महसूल आयुक्तालय स्थापन करण्याचा प्रस्ताव गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे.

ही बाब लक्षात घेता गत महिण्यापुर्वी आपण नांदेड दौऱ्यात आयुक्तालयाच्या प्रश्न निकाली काढण्याबाबत वक्तव्य केले होते याची आठवण सोनुले यांनी निवेदनात करून दिली आहे. नांदेड जिल्ह्यात १६ तालुक्यात ८० महसूल मंडळे असून ४५७ तलाठी सज्ज होते.पुनर्रचनेनंतर महसूल मंडळाच्या संखेत १४ ने वाढ झाली असून एकूण ९३ महसूल मंडळे व ५४१ तलाठी सज्जे झाले आहेत. कामाचा वाढता आलेख पाहता,इतर जिल्ह्यांना सोयीस्कर होईल या ही दृष्टीने तसेच भौगोलिक दृष्टीने आयुक्तालय नांदेड येथे झाले पाहिजे अशी आमची आग्रहाची मागणी असल्याचे निवेदनात त्यांनी स्पष्ट केले.

## श्रीगोंदा तालुक्यातील युवकाच्या निर्घृण खुनाचा उलगडा! एक संशयित आरोपी जेरबंद

**अक्षराज : वसंत रांधवण**




**दि.१७, अहिल्यानगर :** श्रीगोंदा तालुक्यातील दाणेवाडी येथे युवकाचा अत्यंत निर्घृणपणे खून केल्याची घटना उघडकीस आली होती. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त माहितीच्या आधारे अवघ्या काही दिवसांत एका संशयित आरोपीला जेरबंद करत गुन्ह्याचा छडा लावला आहे. नाजूक प्रकरणात अडथळा आल्याने हा प्रकार घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

१२ मार्च रोजी श्रीगोंदा दाणेवाडी येथे विठ्ठल दत्तू मांडगे यांच्या शेतातील विहिरीमध्ये एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह पोत्यात भरून टाकण्यात आल्याचे आढळले. तपासानंतर स्पष्ट झाले की, मृत व्यक्तीचे मुंडके, दोन्ही हात आणि उजवा पाय धडावेगळे करण्यात आले होते. यासंदर्भात बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता. या अत्यंत गंभीर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सुपूर्द करण्यात आला. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले. निरीक्षक आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि मिसिंग नोंदींची पडताळणी करून मृत व्यक्तीची ओळख पटवली. मृतदेह हा माऊली सतीश गव्हाणे (वय १९, रा. दाणेवाडी, पो. राजापूर, ता. श्रीगोंदा) याचा असल्याचे निष्पन्न झाले. रविवारी (दि.१६) स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त माहितीच्या आधारे संशयित आरोपी सागर दादाभाऊ गव्हाणे (वय २०, रा. दाणेवाडी, ता. श्रीगोंदा) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून प्राथमिक तपासात त्याच्याविरुद्ध ठोस पुरावे मिळाले आहेत. ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक आहेर यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक तुषार धाकराव, पोलिस अंमलदार बापूसाहेब फोलाणे,शाहीद शेख,बिरप्पा करमल,अरुण गांगुर्डे, संतोष खैरे, महादेव भांड, प्रशांत राठोड, मेघराज कोल्हे यांनी केली आहे.

**नाजूक प्रकरणाचे डफडे !**

माऊली गव्हाणे या युवकाने दोन व्यक्तींचे नाजूक प्रकरण चव्हाट्यावर आणले म्हणून त्याचा कायमचा काटा काढण्याचा प्लॅन संशयित आरोपी सागर गव्हाणे व त्याच्या साथीदाराने आखला होता. माऊलीने बदनामी केली असल्याचा राग मनात धरून त्याचा अत्यंत निर्घृण खून करून पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहाचे मुंडके, दोन्ही हात आणि उजवा पाय धडावेगळे करण्यात आले होते. मात्र गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मोठी कसरत घेत या गुन्ह्याचा छडा लावला. संशयित आरोपी सागर गव्हाणे याला गजाआड करण्यात आले.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर सर्वांसाठी अभिमानास्पद अन् प्रेरणादायी - मुख्यमंत्री फडणवीस



**दि.१७, ठाणे :** देव, देश अन् धर्मापायी ज्या राजाने आपले संपूर्ण आयुष्य खर्ची पाडले, अशा सर्वांसाठी दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांचे मंदिर होणे, ही अतिशय अभिमानाची बाब असून सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. येथे महाराजांच्या दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भिवंडी तालुक्यातील शिवक्षेत्र मराडे पाडा, ता.भिवंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचे (शक्तीपीठ) लोकार्पण झाले. यावेळी स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज, प.पू. बालयोगी सदानंद बाबा, ह.भ.प डॉ.कैलास महाराज निचिते, राष्ट्रसंत नीलकंठ शिवाचार्य, प.पू. आलोकनाथ महाराज, खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार किसन कथोरे, आमदार दौलत दरोडा, आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश चौघुले, शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजू चौधरी, विश्वनाथ पाटील, नरेंद्र पवार, जितेंद्र डाकी, विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक (कोकण परिक्षेत्र) संजय दराडे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस. स्वामी, अनंता भोईर, आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कैलास निचिते व राजू चौधरी यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य मंदिराच्या संकल्पना व प्रत्यक्ष निमणाकरिता कौतुक केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपण छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच आपल्या इष्ट देवतेचे मंदिरात जावून दर्शन घेवू शकतो. अतिशय सुंदर, भव्य दिव्य असे हे मंदिर निर्माण करण्यात आले आहे. या मंदिराला सुंदर तटबंदी आहे, अतिशय चांगले बुरुज आहे, दर्शनीय प्रवेश मार्ग, बगीचा आहे. या मंदिराच्या माध्यमातून महाराजांच्या जन्मापासून ते राज्याभिषेक आणि पुढे संभाजी महाराजांची वाटचाल असे अतिशय सुरेख प्रसंग उभे करण्यात आले आहेत. यातून प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.

आई जिजाऊंच्या संस्कारांनी अन् आशिर्वादाने शिवबा घडले. त्यांच्या प्रेरणादायी शिकवणीतूनच शिवरायांनी मुघलांच्या आव्हानांचा प्रतिकार केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांच्या बलाढ्य फौजेविरुद्ध सर्वसामान्य जनतेतून शक्ती निर्माण केली आणि भगवा झेंडा फडकविला. छत्रपती शिवाजी महाराजांची ३०० वी जन्मशताब्दी साजरी होत असताना देश घडविण्याच्या कार्यात आपले योगदान देवू या, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य व केंद्र शासनाकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा किल्ल्यांचा जागतिक वारसा म्हणून नोंद होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. संगमेश्वर येथे देखील छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात येणार असून त्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. पानिपत येथील लढाई सर्वांना माहितच आहे. महादजी शिंदे यांनी गाजविलेला पराक्रम सर्वांना माहीत आहे. त्या ठिकाणीही भव्य स्मारक उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

लोकार्पण झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या या शक्तीपिठाला तीर्थस्थळाचा दर्जा देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. त्याचप्रमाणे भिवंडी-वाडा या रस्त्याचे कामही प्रगतीपथावर आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या शक्तीपिठाकडील येणाऱ्या सर्व मार्गांचे नियोजन उत्तमरित्या करावे, येथे येणाऱ्या शिवप्रेमींसाठी आवश्यक सोयीसुविधा तयार कराव्यात. याकरिता निधीची कमतरता पडणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील व आमदार किसन कथोरे यांनी मनोगत व्यक्त केले.

## शिक्षक सर्वगुणसंपन्न असावा- उपशिक्षणाधिकारी छाया साळवे

**अक्षराज : प्रभाकर हजारे**




**दि.१७, मुंबई :** बदलत्या काळाच्या ओघात शालेय शिक्षक हा स्वतःमध्ये बदल करणारा, स्वतःला काळानुरूप सिध्द करणारा आणि सर्वगुणसंपन्न असावा.असा आशावाद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर विभागाच्या उपशिक्षणाधिकारी छाया साळवे यांनी व्यक्त केला. त्या परळ भोईवाडा महानगरपालिका शाळेत आयोजित केलेल्या शिक्षकोत्सव कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी बोलत होत्या.

याबाबत सविस्तर माहिती अशी की दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मनपाच्या प्राथमिक शिक्षकांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी महापालिकेच्या वेगवेगळ्या झोन नुसार शिक्षकांना कार्यक्रम ठरवून दिले होते. त्याअनुषंगाने मुंबई शहर विभागातील शिक्षकांना देशाच्या पूर्वेकडील राज्याच्या सांस्कृतिक कलाकृतीवर आधारित नृत्य सादर करणे बाबत सूचना दिली होती.त्यानुसार शहर परिमंडळातील सात विभागांनी आपले कलेतील कसब दाखवून आपल्यातील कलाकार दाखवून दिला.

आसामी बिहू नृत्य, अरुणाचल प्रदेशातील थाईकामटी नृत्य, केरळ राज्याचा कोईथुपाट्टू नृत्य, नागालँड चे नागानृत्य, तेलगू नृत्य असे वेगवेगळ्या धाटणीचे उत्तम नृत्य शिक्षकांनी सादर केले. अगदी व्यावसायिक नृत्यिका असल्या सारखे शिक्षकांचे नृत्य पाहून परिक्षकही अचंबित झाले.या नृत्यामधून तीन उत्कृष्ट नृत्यांची निवड करून त्यांना प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक जाहीर केला. जी/उत्तर विभागाच्या शिक्षकांनी सादर केलेल्या थाई कामटी नृत्याचा प्रथम क्रमांक, फ/दक्षिण विभागाच्या नागा नृत्याचा द्वितीय क्रमांक आणि फ/उत्तर विभागाच्या कोईथुपाट्टू नृत्याचा तृतीय क्रमांक आला. या वेळी परीक्षक म्हणून मुंबईतील सुप्रसिद्ध व नामांकित असलेले अभिषेक शिंदे,विनय चौगुले आणि मानिनी पवार यांनी उत्तम परीक्षण केले. या स्पर्धेत जिंकलेल्या तिन्ही नृत्यांची लवकरच आण्णाभाऊ साठे सभागृहात अंतिम स्तरावर स्पर्धा होणार आहे.या स्पर्धेत निवड झालेल्या तिन्ही नृत्य ग्रुपचे अभिनंदन करत उपशिक्षणाधिकारी छाया साळवे यांनी ट्रॉफी देऊन सन्मान केला. पुढील अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला जी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे,जी/उत्तर विभागाच्या प्रशासकीय अधिकारी स्नेहलता डुमरे,आणि फ/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी राजकुमारी गिरी यांच्यासह शा शि चे कनिष्ठ पर्यवेक्षक मधुकर माळी,अंकुशराव बागल, व सर्व विभाग निरीक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती.


संगीत शिक्षिका स्वाती सुर्वे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वागत गीत व पसायदान सादर केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परळ भोईवाडा शाळेच्या इमारत प्रमुख तथा मुख्याध्यापक प्रियांका दुधसागरे,कांताराम खंडवी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## रेल्वे प्रश्नासाठी कळंबकर सरसावले, बैठकीस उत्तम प्रतिसाद

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१७, धाराशिव :** केंद्र शासनाच्या रेल्वे मंत्रालयाने उस्मनाबाद व्हाया बीड औरंगाबाद रेल्वे मार्गासाठी अर्थसंकल्पात आठ कोटीची तरतूद केली आहे. यामुळे धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुका ही रेल्वेच्या नकाशावर येणार आहे. याबद्दल कळंब येथील नागरिकांनी आनंद व्यक्त करून शासनाचे आभार व्यक्त केले.

या प्रश्नासाठी रविवार दि १६ मार्च रोजी येथील पंडित जवाहरलाल नेहरू उद्यान परिसरातील ज्येष्ठा साठीचा विरंगुळा येथे रेल्वे सर्वेक्षण आणि रेल्वे स्थानक संदर्भात डॉ रामकृष्ण लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत केंद्र शासनाच्या रेल्वे



बैठकीत सर्वेक्षण करताना रेल्वे मार्ग कळंब जवळून निश्चित करावा, त्या मार्गावर कळंब रेल्वे स्थानक करावे, रेल्वे सर्वेक्षण संदर्भातील शासकीय दस्तऐवज उपलब्ध करून त्याचा सखोल अभ्यास करणे, रेल्वे चे संबंधित अधिकारी, खासदार, आमदार, यांना भेटून आपल्या मागण्या लावुन धरणे, इ विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

## धिम्म प्रशासनामुळे आजपासून माथेरान बेमुदत बंद

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१७, माथेरान :** दस्तुरी नाक्यावरील येणाऱ्या पर्यटकांची दिशाभूल करून आर्थिक फसवणूक केली जाते. याचा येथील सर्वसामान्य कष्टकरी पासून ते हॉटेल इंडस्ट्री या सर्वांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम झालेला आहे.ही फसवणूकीची पध्दत लवकरच बंद करण्यात आली नाही तर दिनांक १८ मार्च २०२५ पासून बेमुदत माथेरान बंद करण्यात येणार असा इशारा समितीने सर्वच अधिकारी वर्गाला दिला होता. त्यासाठी अधीक्षक कार्यालयात समितीच्या सदस्यांच्या बैठकीचे आयोजन दि.१७ मार्च २०२५ रोजी करण्यात आले होते.

या आयोजित केलेल्या बैठकीत स्थानिक प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला नसून माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीने मागणी केलेल्या शुल्लक मागण्यांची पूर्तता स्थानिक प्रशासन स्थानिक पातळीवर करू शकत नसल्याने या पर्यटन बचाव संघर्ष समितीने दि.१८ मार्च २०२५ पासून बेमुदत बंद जाहीर केला. त्यास येथील हॉटेल इंडस्ट्री, ई रिक्षा संघटना, व्यापारी वर्ग, विविध सामाजिक संस्था यांनी समर्थन दिले. जोपर्यंत स्थानिक प्रशासन लेखी स्वरूपात मागणी केलेल्या शुल्लक मागण्या कायमस्वरूपी पूर्ण करत नाही. तोपर्यंत हे पर्यटनस्थळ बेमुदत बंद करण्यात येणार असल्याचे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले आहे. या बंदामध्ये शालेय विद्यार्थ्यांना सुध्दा ई रिक्षाची सेवा बंद करण्यात येणार आहे. असे संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल यांनी सांगितले आहे.

माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावर पर्यटकांची ज्याप्रकारे फसवून त्यांची दिशाभूल केली जाते. त्यांना बळजबरीने गावात येण्याऐवजी पॉईंट्स दाखवून उशिरा हॉटेलमध्ये सोडण्यात येते. मिनिट्रेन बंद असून ई रिक्षाची सेवा फक्त स्थानिकांना दिली जाते. अशी खोटी माहिती देऊन स्वतः च्या घोड्यावर बसवून नवख्या पर्यटकांची दिशाभूल करून अव्वाच्या सव्वा रक्कम उकळली जाते. त्यासाठी दस्तुरी नाक्यावरील अंतर्गत भागात घोडेवाले असोत किंवा कुली, रूम्सचे एजंट, रिक्षावाले यांना प्रवेश देऊ नये. जागोजागी माहिती फलक लावण्यात यावेत, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत.

अशी माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीने फेब्रुवारीच्या २७ तारखेला शुल्लक मागणी केली होती. ही मागणी पूर्ण झाली नाही तर माथेरान बेमुदत बंद करण्याचा इशारा सुध्दा या समितीने अधीक्षक सुरेंद्र ठाकूर, मुख्याधिकारी राहुल इंगळे, वनखात्याच्या



अधिकारी वर्गाला तसेच पोलीस ठाण्यात सुध्दा लेखी निवेदना द्वारे दिला होता. परंतु १० दिवस उलटून ही या स्थानिक प्रशासनाने काहीएक उपाययोजना केली नाही.

त्यामुळे नाईलाजाने माथेरान बेमुदत बंद करून शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी समितीने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी समितीचे प्रमुख कुलदीप जाधव, मनोज खेडकर, शिवाजी शिंदे, प्रवीण सकपाळ, राजेश चौधरी, प्रदीप घावरे, चंद्रकांत जाधव, हॉटेल इंडस्ट्रीचे उमेश दुबल, ई रिक्षा संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, चर्मकार समाज अध्यक्ष नितेश कदम, महिला आघाडीच्या संगीता जांभळे, सुहासिनी शिंदे, प्रतिभा घावरे, स्वाती कुमार, सुहासिनी दाभेकर, अंकिता तोरणे, श्रुतिका दाभेकर यांसह अन्य उपस्थित होते.

## आदिवासी मधील कोळी मल्हार जमातीचे विचारमंथन सभा संपन्न

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१६, डहाणू (पालघर) :** आदिवासी समाजातील कोळी मल्हार जमातीची विचार मंथन सभा डहाणू मधील कासा येथे दिनांक १६ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आली. यावेळी पालघर मधील डहाणू, पालघर, विक्रमगड, वसई तसेच वाडा मधील तसेच भिवंडी, शहापूर, ठाणे या भागातील कोळी मल्हार बांधव एकत्र येथे आले होते. पालघर, ठाणे तसेच मुंबई उपनगरामध्ये ही जमात मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. आदिवासी समाजाच्या अस्तिव, संघर्ष व संस्कृतीमध्ये या जमातीचे मोठे योगदान आहे. मात्र सध्या ह्या आदिवासीच्या बोगस घुसखोरीमध्ये या जमातीत मोठ्या प्रमाणात घूसखोरी होत आहे. कोळी मल्हार समाज महाराष्ट्रातील एक प्राचीन आणि महत्त्वपूर्ण समाज आहे. ज्यांची संस्कृती, परंपरा, आणि इतिहास समृद्ध आहेत. यामध्ये समाजातील काही महत्वाचे पैलू आहेत. यावेळी उपस्थित विचारवंतानी काही महत्वाच्या विषयावर सभेमध्ये प्रकाश टाकण्यात आला. यामध्ये कोळी मल्हार समातीच्या संस्कृती आणि परंपर मधील

**ग्रामदेवता :** मल्हार कोळी समाजाच्या ग्रामदेवता म्हणजेच दैवताला विशेष महत्त्व आहे. गावातील सण आणि उत्सवांमध्ये ग्रामदेवतेची पूजा केली जाते.

**सण आणि उत्सव :** समाज विविध सण आणि उत्सव साजरे करतो, ज्यामध्ये नृत्य, संगीत, आणि पारंपरिक कला यांचा समावेश असतो.

**नृत्य आणि कला :** पारंपरिक नृत्य आणि कला प्रकार समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहेत.

**स्त्रियांचे स्थान, हुंडा प्रथा :** समाजात हुंडा घेण्याची प्रथा नाही, ज्यामुळे



स्त्रियांचे स्थान अधिक सन्माननीय आहे.

**विधवा स्त्रिया :** विधवा स्त्रियांना समाजात सन्मानाने वागवले जाते आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी केले जाते. याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

कोळी मल्हार समाजाच्या संस्कृतीचे संवर्धन आणि संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांच्या परंपरा, कला, आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी शैक्षणिक कार्यक्रम, सांस्कृतिक महोत्सव, आणि संशोधन यांचा उपयोग होऊ शकतो. यामुळे आगामी पिढ्यांना त्यांच्या समृद्ध वारशाची ओळख होईल आणि समाजाच्या प्रगतीस हातभार लागेल. यावेळी या विचार मंथनमध्ये माजी आमदार राजेश पाटील, माजी आमदार अविनाश सुतार, पालघर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा वैदेही वाढाण, सुनिल झळके, माजी समाज कल्याण सभापती पांडुरंग बेलकर, विलास बेलकर, नरेंद्र काळे, लतिका बालशी, स्नेहलता सातवी तर अनेक ग्रामपंचायतीचे सरपंच, सामाजिक कार्यकर्ते या सभेला उपस्थित होते. या सभेचे सूत्रसंचालन नितीन बोंबाडे यांनी केले.

## प्रधानमंत्री आवास योजनेतील मंजूर घरकुलांचे आ.पाटील यांचे हस्ते भूमिपूजन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१७, पंढरपूर :** माढा तालुक्यातील मौजे जाधववाडी येथील प्रधानमंत्री आवास योजनेतून मंजूर झालेल्या ५१ घरकुलांचे भूमिपूजन माढा तालुक्याचे विद्यमान आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. पंतप्रधान आवास योजनेमधून नवीन घराचे स्वप्न पूर्ण होत आहे. ही आनंदाची बाब आहे. ज्या लोकांना ह्या योजनेचा लाभ मिळाला आहे. त्यांनी योग्य पद्धतीने आपले घर बांधून त्याचा त्याचा उपयोग करावा. तसेच ज्या लोकांना अद्याप पर्यंत ही योजनेचा लाभ मिळाला नाही. त्यांनी लवकरात लवकर



अर्ज करून ह्या योजनेचा लाभ घ्यावा. प्रकल्पाच्या माध्यमातून अनेक कुटुंबांचे स्वतः च्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित निवारा मिळावा. हा त्यांचा हक्कच आहे. माढा मतदारसंघाच्या विकसित मतदार संघासाठी सातत्याने मी देखील प्रयत्नशील असेल असे आमदार अभिजीत आबा पाटील यांनी सांगितले.

यावेळी सरपंच राहुल जाधव, चेअरमन शिवाजी भाकरे, आनंद आप्पा कानडे, सरपंच वंदना जाधव, डीव्हीपी बँकेचे चेअरमन भाऊसाहेब महाडिक, बापूसाहेब जाधव, शंभूराजे साठे, आबा साठे, जितू जमदाडे, गणेश साळुंखे, दयानंद जाधव, सोमनाथ राऊत, अनिल शिंदे, विजय भाकरे, नवनाथ जाधव, विक्रम जाधव, तानाजी जाधव, प्रकाश उबाळे, सौदागर चव्हाण, सुनील कन्हेरे व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

## विकसित भारताच्या निर्माणासाठी विकसित महाराष्ट्राचा रोडमॅप ठरविणारा अर्थसंकल्प-उपमुख्यमंत्री पवार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला २०४७ पर्यंत विकसित देशांच्या पंक्तीत नेऊन बसविण्याचा निर्धार केला आहे. त्यासाठी महाराष्ट्रानेही कंबर कसली आहे. त्याचे प्रतिबिंब राज्याच्या अर्थसंकल्पात निश्चित दिसून येत आहे. विकसित भारताच्या निर्माणासाठी विकसित महाराष्ट्राचा रोडमॅप ठरविणारा हा अर्थसंकल्प असून महाराष्ट्राचा संतुलित विकास करण्याची क्षमता अर्थसंकल्पात असल्याचाविश्वास आज सन२०२५- २६च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या उत्तरात व्यक्त केला. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. महाराष्ट्राचा देशाच्या प्रगतीत पूर्वीपासून सिंहाचा वाटा राहिलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशासाठी निश्चित केलेले लक्ष्य गाठण्यासाठी महाराष्ट्र कुठेही कमी पडणार नसल्याची ग्वाहीही उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी दिली.

महाराष्ट्र सर्वांपेक्षा जास्त योगदान देईल,हे या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून साध्य करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही केलेला आहे. त्यामुळेच विकसित भारत, विकसित महाराष्ट्रहा या अर्थसंकल्पाचा मूळ गाभा असल्याचेही त्यांनी सांगितले.

**मागील काळातील योजनांबाबत :** उपमुख्यमंत्री म्हणाले, सर्वच योजनांचे वेळोवेळी पुनर्विलोकन होत असते. ज्या योजना कालबाह्य ठरतात,त्या बंद कराव्या लागतात. कोविडमध्ये आपण काही योजना, सवलती सुरु केल्या. त्या कोविड संपल्यावर बंद कराव्या लागल्या. काही वेळा केंद्र शासनाकडून राज्याकडील योजनेप्रमाणेच लाभ देणारी नवीन योजना येते. योजनेची द्विरुक्ती नको व्हायला आणि राज्याचा खर्च वाचावा म्हणून आपली योजना आपण बंद करतो. राज्याचा प्राधान्यक्रमराज्याच्या खर्चाचा प्राधान्यक्रम गरजेनुसार बदलत असतो. यावेळी विकसित देश आणि विकसित महाराष्ट्रासाठी शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार आणि समाजातील सर्व घटकांसाठी विकासात्मक योजना या ५ प्रमुख क्षेत्रांना प्राधान्य देण्याची आवश्यकता होती. या क्षेत्रांवर विशेष लक्ष देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून केलेला आहे. राज्याच्या दळणवळणाच्या सुविधांकडे सरकार विशेष लक्ष देत आहे आणि यापुढेही देणार आहे. रस्त्याचे जाळे वाढले तर कंपन्यांच्या उत्पादकतेत वाढ होते. शेतकऱ्यांचा वाहतुकीवरचा खर्च कमी होतो. इंधनावरील राज्याच्या, देशाच्या परकीय चलनात बचत होते आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठी वाढ होते. यासाठी अर्थसंकल्पात रस्ते बांधणीसाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केल्याचेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले. अमृतकाल राज्य रस्ते विकास आराखडा२०२५ते२०४७,ज्याचा उल्लेख याच विचारावर आधारीत आहे.

**कृषी विकास दर :** कृषीचा २०२३-२४ चा विकास दर ३.३ टक्के होता. सरकारने शेतक-यांना आर्थिक ताकद दिली, त्यामुळे२०२४-२५चा कृषीचा विकास दर८.७ टक्क्यांवर गेला. कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञान, जलयुक्त शिवार, एक तालुका एक बाजारपेठ, सिंचनासाठी नदीजोड प्रकल्प, महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम,बांबू लागवड,मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी मराठवाडा वॉटर ग्रीड यासारख्या कार्यक्रमांसाठी तरतुदी केलेल्या आहेत. शेतकऱ्यांनी आधुनिकतेची कास धरली पाहिजे. पण ही सुविधा निर्माण करुन देण्याची जबाबदारी सरकारची आहे.म्हणूनच पीक नियोजनाचा सल्ला देण्यासाठी आणि त्यांची उत्पादकता वाढविण्यासाठी एआय तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन देणार आहोत. येत्या दोन वर्षात५००कोटी निधी आपण यासाठी खर्च करणार आहोत. एआय तंत्रज्ञान (कृत्रीम बुदधीमत्तेचा वापर) येणाऱ्या काळात कृषी क्षेत्राला नवसंजीवनी देईल आणि त्यातून महाराष्ट्रातला शेतकरी समृध्द होईल.राज्यात ४५ लाख कृषीपंपांसाठी मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला. कोरोनात सर्वच क्षेत्रांची कामगिरी ढासळली होती. फक्त कृषी क्षेत्राने राज्याला तारलं होते. शेती हा राज्यसरकारच्या प्राधान्यक्रमातील महत्वाचा घटक आहे. म्हणूनच या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी ९ हजार ७००कोटीची भरीव तरतूद केली आहे.

**विक्रमी सोयाबीन खरेदी व शेतकऱ्यांसाठी केलेली तरतूद :** देशात सर्वाधिक विक्रमी ११.२१लक्ष मे. टन खरेदी करण्यात आली आहे. यासाठी नाफेड,एनसीसीएफ द्वारे५०९२कोटी वितरीत करण्यात आली आहे.राज्यात धान खरेदी बोनससाठी१३८०कोटी रुपये, कांदा खरेदी अनुदान३४८कोटी, दूध अनुदानासाठी९८२कोटी,कापूस व सोयाबीन अनुदान३०००कोटी,नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना ५९११कोटी मदत, मोफत वीजसाठी१७,८००कोटी,नमो शेतकरी सन्मान योजनेकरीता६,०६०कोटी,कुसुम योजना,मागेल त्याला सोलारपंप१५०कोटी, पोकरा२.०साठी ३५०कोटी, स्मार्ट योजनकरीता३१०कोटी,मॅग्नेटसाठी२६०कोटी,पंजाबराव देशमुख्य व्याज सवलत ३०० कोटी तरतूद करण्यात आली आहे.

# थोडक्यात

## नवी मुंबईत महाकुंभतीर्थ दर्शन सोहळा संपन्न



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१६, नवी मुंबई :** बोनकोडे १२ए कोपरखैरणे दत्त मंदिर अनुगामी लोकराज्य महाभियान श्री.हनुमान चालीवर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने महाकुंभतीर्थ दर्शन सोहळा अनुलोम ही समाजामध्ये सकारात्मक विचार करणारी संघटना असून या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकांमध्ये बदल व्हावा. यासाठी प्रयत्नशील आहे. प्रयागराजमध्ये १४४ वर्षानंतर संपन्न होत असेलला महाकुंभमेळा हिंदू धर्मात नवीन बदल घडविण्याचे कार्यच करीत आहे. या महाकुंभमेळ्यात जगभरातून करोडो हिंदू बांधव गंगा, सरस्वती, यमुना या नदीच्या त्रिवेणीसंगमात स्नान करण्यासाठी येत असून समाजातील समरसतेचे दर्शन दिसत आहे. हिंदू समाजातील अनेकजण या संगमाला काही कारणामुळे प्रत्यक्ष जावू शकत नाही आणि प्रत्यक्ष या स्नानाचा अनुभव घेऊ शकत नाही. अशाकरिता किमान या त्रिवेणी संगम ठिकाणचे तीर्थ दर्शन व्हावे. याकरिताच अनुलोमच्यावतीने महाकुंभ तीर्थदर्शन सोहळ्याचे आयोजन दत्त मंदिर बोनकोडे येथे रविवार, दिनांक १६ मार्च २०२५ सकाळी ११ वाजता वा आयोजन केलेले होते. कोपरखैरणे परिसरातील अनेक भक्तांनी या महाकुंभ तीर्थ लाभ घेतला. या कार्यक्रमात सुधाकर पाठक, श्रीहरी पवळे, संजय पोकळे, संतोष मडव, स्वानंद अत्रे.ए एस पाटील, केसरी मीरा कोर, भोईर शामराव सोरटे, वर्षा सोरटे आणि अनेक भक्तांनी या कार्यक्रमाला हजर राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली असे ट्रस्टी श्रीहरी पवळे यांनी सांगितले.

## मनसेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव २०२५



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, सुपा (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने माथाडी कामगार सेनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अविनाश पवार यांच्या वतीने सुपा बसस्थानक चौक येथे तिथीनुसार शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सुपा येथील जेष्ठ नागरिक रामदास बर्डे यांच्या हस्ते करण्यात आले पत्रकार बांधव तसेच सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते, अँब्युलन्स चालक, महावितरण चे वायरमन बंधु भगिनींचा तसेच वाहतूक पोलीस बांधवांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुपा गावचे उपसरपंच दत्ता नाना पवार, कामगार आघाडीचे नेते कल्याण शहाणे, बाळासाहेब पवार, नितीन म्हस्के, अक्षय सुर्यवंशी, विजय पवार, प्रकाश पवार, शादिक भाई, अल्ताफ भाई, पत्रकार शरद रसाळ, राजकुमार इकडे, विशाल फटागंडे, सुदाम दरेकर, रोहित मेमाणे, अरुण वाळुंज थोरात वायरमन, जरे, कडु, दिवटे यांच्या सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विंचूरला 'हृदयरोग जागरूकता' या विषयावर व्याख्यान संपन्न



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात हृदयरोग व मधुमेह तज्ञ डॉ.हिरालाल पवार यांचे 'हृदयरोग जागरूकता' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. व्याख्यानाच्या सुरुवातीला डॉ. हिलाल पवार यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना अभ्यास कसा करावा, शिक्षकांनी आज शिक्षण कसे देण्याची गरज आहे. मुलांनी कोणत्या विषयाचीकसी तयारी करावी, विदेशातील डॉक्टरांपेक्षा भारतातील डॉक्टर जास्त मेहनती आहे. कारण स्टडी करण्याची क्षमता जास्त भारतीयांमध्ये असते. म्हणून यश घेयचे असेल तर मेहनती शिवाय पर्याय नाही. आणि मेहनती बरोबर आत्मविश्वास हा खुप महत्वाचा असतो. पुढे डॉक्टर सांगतात, आनंदी राहा, मैदानी खेळ खेळा, दिवसातुन किमान एक - दोन तास मन आनंदी ठेवण्यासाठीचा प्रयत्न करा. त्यात मग संगीत असो, खेळ असो, गायन असो आणि ट्रेस घेऊ नका. वर्षात मधून- मधून रक्तदाब, शुगर, हृदया संबंधीच्या चाचण्या करून घेत चला, निष्काळजीपणा करू नका. प्रत्येक गावात ग्रामपंचायतीने एसीजी मशीन, रक्तदाब चेक करण्याचे मशीन लावण्याची आज गरज आहे. लोक डॉक्टरकडे जाण्याचा कंटाळा करतात. त्रास झाल्यावरच डॉक्टरकडे गेले पाहिजे असे नाही. सध्या डायबिटीजची व्याप्ती खूप वाढत चाललेली आहे. अटॅक आल्यानंतर हृदयाचे पंपिंग क्षमता कमी होते. हा आजार वंशिका असल्याने गावातल्या - गावात लग्न पद्धती ही घातक आहे. निरोगी माणसाने ही आपले हृदयाचे चेकिंग करणे गरजेचे आहे. पुढे असेही डॉक्टर म्हणतात की, जोपर्यंत एकदा वेळ निघून गेली तर तुम्ही तुम्हाला हवे ते मिळवू शकत नाही. आपण आपली कमकुवत बाजू ओळखून त्यावर काम केले पाहिजे.

## जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीज उत्सव साजरा

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१७, धाराशिव :** कळंब येथील दक्षिण मुखी हनुमान भजनी मंडळाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांचा वैकुंठ गमन दिन संत तुकाराम महाराज बिज उत्सव 'फाल्गुन कृष्ण २' दिनांक १६ मार्च २०२५ रोजी कळंब येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यानंतर भजन गायन कार्यक्रम घेण्यात आला. आम्ही जातो आमच्या गावा ! आमचा रामराम घ्यावा !! या संत श्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे भजन गायन करीत दुपारी १२ वाजता गुलाल व फुले उधळून आरती करण्यात आली. यानंतर भक्त तानाजी कदम यांच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे खीर प्रसाद वाटप करण्यात आले. याप्रसंगी दक्षिणमुखी हनुमान भजनी मंडळातील सदस्य व भक्त यांची उपस्थिती होती.